**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ विद्या यांचा शपथेवर पुढील सरतपास विधिज्ञ श्री.व्ही.आर.नाईक यांच्या मार्फत–**

१०. मी माझे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१२५ प्रमाणे दाखल केले आहे. सदर शपथपत्र माझे वकिल साहेब यांनी मी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार केले असून ते मला वाचून दाखविले. त्यातील मजकूर संपुर्णपणे बरोबर असून त्यावर मी माझ्या सह्या केल्या आहेत. मी सत्यवान लक्ष्मण सावंत यांचे हक्कात करुन दिलेले मुळ कुलमुखत्यारपत्र दाखल केले आहे. आता मला ते दाखवण्यात आले. त्यावर माझी व सत्यवान सावंत यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर कुलमुखत्यारपत्र **नि.क्र.१२८** प्रमाणे आहे. दि.२९/०१/२०१० रोजीचे सत्यवान लक्ष्मण सावंत यांचे हक्कात लक्ष्मण नारायण राणे यांनी करुन दिलेले कुलमुखत्यार पत्र दाखल केले आहे. ते **नि.क्र.१२९** प्रमाणे आहे. लक्ष्मण नारायण राणे यांनी सत्यवान लक्ष्मण सावंत यांचे हक्कात दिलेल्या मुखत्यारपत्रावरुन सत्यवान लक्ष्मण सावंत यांनी माझे हक्कात दि.१६/०९/२०१० रोजी करुन दिलेले मुळ खरेदीखत दाखल केले आहे. आता मला ते दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर खरेदीखत **नि.क्र.१३०** प्रमाणे आहे.

सरतपास पुर्ण.

सर्व प्रतिवादी गैरहजर. करीता उलटतपास नाही.

| | |
|---|---|
| ''माझे समक्ष'' | श्रवणोत्तर स्वीकृत |
| सही/– | सही/– |
| (टी.एच. शेख) | (टी.एच. शेख) |
| दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर |
| कणकवली | कणकवली. |

दिनांकः ०७/१२/२०२३